PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Terminal Examination (2024-25)
## Standard - X

**Subject - MARATHI** | **Marks - 80**
**Date - 17.10.2024** | **Time - 8.00 am to 11.00 am**

## विभाग १ – गद्य

**प्र. १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

आवाज, गडबड, गोंधळ, चेहऱ्यावरचा आनंद आणि हे सारे वातावरण निर्माण करणारा चुडीवाला अब्दुल म्हणजे तपोवनातील स्त्रियांना, मुलींना अगदी देवदूतासारखा वाटे. वर्षातून दोनदा, संक्रांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला तपोवानातील स्त्रिया चुडीवाल्याची आतुरतेने वाट पाहत आणि अब्दुललाही तो आनंद बघून विलक्षण समाधान लाभे.

असेच काही दिवस गेले. एक दिवस रघुभैया आला. त्याच्या हाती पोस्टमनने दिलेले पत्र होते.

'' अब्दुलमियाँ, तपोवन से चिठ्ठी आयी है आपको.''

'' दिखाव........दिखाव.''


'' अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे.

'' मग वाचून दाखव नं तूच.''

रघुभैयाने चिठ्ठी मोठ्याने वाचली. चिठ्ठीतला मजकूर ऐकून अब्दुल आणि शन्नू यांना खूप आनंद झाला. तपोवनात होणाऱ्या संमेलनाच्या प्रसंगी अब्दुलचा खास सत्कार होणार होता आणि त्यासाठी पत्र पाठवून दाजीसाहेबांनी त्याला निमंत्रण दिले होते. दोन दिवसांनीच सत्कार समारंभ होता. कधीही लाभणार नाही असे सत्काराचे भाग्य त्याच्या वाट्याला आले होते. पत्र आल्यापासून तो त्याच आनंदात होता. पुन्हा पुन्हा तो स्वतःच स्वतःला विचारत होता, सत्कार करण्याएवढे मी काय केले आहे तपोवनासाठी ?

अब्दुल तपोवनात आला तेव्हा कार्यक्रम सुरू झाला होता. स्टेजच्या समोर, बाजूला मांडलेल्या खुर्च्यांवर काही निमंत्रित पाहुणेमंडळी बसली होती. अब्दुलला त्यांच्याबरोबर बसायला संकोच वाटला. तो तसाच उभा राहिला. तेवढ्यात खुद्द दाजीसाहेबांनीच त्याला बोलावून जवळच्या खुर्चीवर बसायला लावले. सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाला सुरूवात झाली. सुरूवातीचे अध्यक्षांचे स्वागत वगैरे औपचारिक झाल्यावर दाजीसाहेबांनी बोलायला सुरूवात केली. अब्दुल बघतच राहिला, चौऱ्याऐंशी वर्षांच्या वृद्धाचा ताठपणा, उंच सडसडीत देहयष्टी, तेजःपुंज चेहरा, गौरवर्ण, पांढरेस्वच्छ धोतर, त्यावर बंद गळ्याचा कोट आणि डोक्याला केशरी फेटा. या वयातही आवाजातला खणखणीतपणा आणि बोलण्यातली ऐट यामुळे अब्दुल भारावून बघत राहिला.

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** ( २ )




**२) एका वाक्यांत उत्तरे लिहा.** (२)

१) कोणत्या दोन दिवशी तपोवनातील स्त्रिया अब्दुलची आतुरतेने वाट पाहत असत ?

२) अब्दुल आणि शन्नू यांना आनंद का झाला ?

**३) स्वमत लिहा –** (३)

सत्यता पटवून द्या. – 'अब्दुल एक थोर समाजसेवक'

**प्र. १ (आ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्याची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कँटीनच्या आचाऱ्याने तर माझ्या 'डायट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार ! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार' च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आच्याऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते - म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पती' तला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली ?' या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.

शेवटी मला राहवेना. भज्यांची सहावी प्लेट उडवल्यावर, मी अत्यंत केविलवाण्या स्वरात 'सध्या मी 'डाएट' वर असल्याचे' सांगितल्यावर सर्वांनी मला वेड्यात काढले.

'' अरे पंत, खाण्याचा आणि वजनाचा काय संबंध ?'' भिकोबा मुसळे म्हणाला, ''मी बघ एकवीस गुलाबजाम खाल्ले - एवढंच काय, आपण तर आयुष्यात एक्सरसाईज नाही केला. तुझी कुंभ रास नि कुंभ लग्न आहे. नुसता वायू भक्षण करून राहिलास तरी तू असाच जाड्या राहाणार. लठ्ठपणा काय आपल्या हातात आहे ?''

'' नॉन्सेन्स !'' जगदाळे ओरडला, ''रनिंग कर रोज.''

''रनिंगपेक्षा देखील दोरीवरच्या उड्या मारा. बरं का पंत, माझ्या सिस्टरचं वेट चाळीस पौंड उतरलं दोरीवरच्या उड्यांनी.'' कु. कमलिनी केंकरे म्हणाली.

शेवटी सर्वांच्या मते मी सकाळी रनिंग करावे आणि संध्याकाळी दोरीवरच्या उड्या माराव्यात असे ठरले आणि मी सातव्या बशीमधले भजे उचलले.

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**

आचाऱ्याने केलेले पदार्थ

**२) चौकटी पूर्ण करा.** **(२)**

अ) अण्णा नाडगौडाने सर्वांना पार्टी दिली कारण -

ब) एकवीस गुलाबजाम यांनी खाल्ले -


**३)** स्वमत - या पाठातील तुम्हाला आवडलेला विनोद कोणता ते लिहा. **(३)**

**प्र. १ (इ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे म्हणून वेळेचा उपयोग समजूतदारपणे केला पाहिजे. वेळेचा वेग किती ? हे कोणालाच सांगता येणार नाही. पण जो वेळेचे भान ठेवतो. त्याला वेळेबरोबर निश्चित जाता येते. वेळेचे महत्त्व जाणून जो कामाचे नियोजन करतो, त्याला दैनंदिन कामाव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींसाठी भरपूर वेळ देता येतो. वेळेचे महत्त्व जाणणारी माणसे आपल्या छंदाची मनापासून पूर्तता करू शकतात. केलेल्या कामाचे समाधान मिळते.

दिवसभराच्या कामाच्या व्यापातून आलेली व्यक्ती दीड-दोन तास ग्रंथालयात वेळ घालवू शकते. 'वेळ नाही' ही सबब केवळ आळशी माणसेच देतात. कारण त्यांच्याजवळ कामाचे कोणतेही नियोजन नसते. त्यामुळे कामही वेळेवर होत नाही आणि त्याचा परिणाम म्हणजे अशी माणसे अपयशाचे धनी होतात व नेहमी दुःखी राहतात.

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**




**२) स्वमत -** **(२)**

तुम्ही वेळेचा सदुपयोग कसा करता, या विषयी थोडक्यात माहिती लिहा.

## विभाग २ - पद्य

**प्र. २ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ।।
मेघमुखें अधःपतन । उदकाचें देखोनि जाण ।
अधःपातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

**१) खालील चौकटी पूर्ण करा.** **(२)**

१) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी - ☐

२) पिलांना सुरक्षितता देणारे - ☐

३) चिरकाल टिकणारा आनंद - ☐

४) व्यक्तीला सदैव सुख देणारा - ☐

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) पाण्याची मधुरता कोणापुरती मर्यादित असते ?

२) योगीपुरुष कोठे जन्म घेतात?

**३) पुढील शब्दांचे अर्थ सांगा.** **(१)**

अ) जेवी  ब) निजज्ञान

**४) स्वमत -** **(३)**

योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे, हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**प्र. २ (आ) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेचे रसग्रहण करा.**

| दोन दिवस | किंवा | अंकिला मी दास तुझा | |
|---|---|---|---|
| १) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री | | १) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री | (१) |
| २) कवितेचा विषय | | २) कवितेचा विषय | (१) |
| ३) कवितेतून मिळणारा संदेश | | ३) कवितेतून मिळणारा संदेश | (२) |
| ४) कविता आवडण्याची अथवा न आवडण्याची कारणे | | ४) कविता आवडण्याची अथवा न आवडण्याची कारणे | (२) |
| ५) दोन दिवस वाट पाहण्यात गेले;<br>दोन दुःखात गेले<br>हिशोब करतो आहे किती<br>राहिलेत डोईवर उन्हाळे<br>या ओळींचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा. | | ५) अग्निमाजी पडे बाळू ।<br>माता धावे कनवाळू ।।<br>तैसा धावे माझिया काजा ।<br>अंकिला मी दास तुझा ।।<br>या ओळींचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा. | (२) |

## विभाग ३ - स्थूलवाचन

**प्र. ३ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(६)**

१) टीप लिहा - बार्क

२) 'आधी केले मग सांगितले' या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

३) तुम्हाला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

४) पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेले विचाार स्पष्ट करा.

## विभाग ४ - व्याकरण

**प्र. ४ (अ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा** **(२)**

१) शाबास ! छान खेळलास.

२) शिस्तीने वागा.

**(ब) कंसातील सूचनेनुसार वाक्य परिवर्तन करा.** **(२)**

१) सुट्टीत भरपूर वाचन करा. (विधानार्थी करा.)

२) माझे घर मोठे आहे (नकारार्थी करा.)

**(क) वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणत्याही २)** **(४)**

१) मळमळ व्यक्त करणे

२) 'आ' वासून पाहणे

३) डोळ्यात पाणी उभे राहणे

४) पारंगत असणे

**(ड) पुढील शब्दांना समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **(१)**

| | |
|---|---|
| १) हात | ३) चंद्र |
| २) आनंद | ४) शरीर |

**(इ) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **(१)**

| | |
|---|---|
| १) शक्य X | ३) स्तुती X |
| २) शहर X | ४) पसंत X |

**(ई) खालील शब्दांचे लिंग बदला. (कोणतेही दोन)** **(१)**

| | |
|---|---|
| १) पाहुणा | ३) मित्र |
| २) बहीण | ४) म्हातारा |

**(उ) खालील शब्दांचे वचन बदला. (कोणतेही दोन)** **(१)**

| | |
|---|---|
| १) बांगड्या | ३) ठसा |
| २) दोरी | ४) शाल |

**(ऊ) विरामचिन्हे ओळखा.** **(१)**

| | | |
|---|---|---|
| १) | , | |
| २) | ? | |

**(ए) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(१)**

१) लिहिचा वाचता न येणारा - ☐

२) गाणे गाणारी - ☐

**(ऐ) पुढील वाक्ये लेखन नियमांनुसार लिहा.** **(२)**

१) अशा परिस्थीतीत माझी शाळा सूरू झाली.

२) रेखामावशी सगळ्यांचं बोलनं लक्ष देऊन एकत होत्या.

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्र. ५ (अ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(६)**

**१) पत्रलेखन –** खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

जनता विदयालय, अहमदनगर
आयोजित जिल्हास्तरीय
चित्रकला स्पर्धा
दि. १ ऑक्टोबर २०२४
वेळ - सकाळी १० वाजता
संपर्क - मुख्याध्यापक,
जनता विदयालय,
अहमदनगर

↓

राजेश / रमा पवार विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

स्पर्धेसाठी शाळेचे सभागृह उपलब्ध करून दयावे यासाठी मुख्याध्यापकांना विनंती करणारे पत्र लिहा.

किंवा

स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त स्पर्धक अजय / अंकिता देसाई याचे / हिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा

**किंवा**

सारांश लेखन - विभाग १ गद्य - प्रश्न १ मधील (इ) अपठित उताऱ्याचा १/३ सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ५ (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

**१) जाहिरात लेखन**

पुढील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.
'आयुर्वेदिक साबणाची' जाहिरात तयार करा.

**२) बातमी लेखन**

तुमच्या शाळेत साजऱ्या झालेल्या स्वातंत्र्यदिनाची (१५ ऑगस्ट) बातमी तयार करा.

**३) कथा लेखन**

खालील मुद्द्यांनुसार कथा लिहा. कथेला योग्य शीर्षक देऊन तात्पर्यही लिहा.
शिंप्याचे दुकान ..... दररोज एक हत्ती त्या रस्त्यावरून नदीकडे जातो ..... दुकानापाशी थांबतो ..... शिंपी खाऊ देतो ..... एके दिवशी शिंपी हत्तीची गंमत करतो ..... सोंडेला सुई टोचवतो ..... हत्ती चिडतो ..... नदीवरचे घाण पाणी सोंडेत भरतो ..... शिंप्याच्या दुकानावर फवारा ..... कपडे खराब - शिंप्याला पश्चाताप

**प्र. ५ (इ) निबंधलेखन : खालील विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळींत निबंध लिहा. (८)**

१) प्रसंग लेखन

| |
|---|
| आदर्श विदयालय, कोल्हापूर<br>**'पुस्तक प्रदर्शन'**<br>चित्रकला स्पर्धा<br>दि. १५ सप्टेंबर २०२४<br>सकाळी ९ वाजता<br>वेगवेगळी पुस्तके<br>उद्घाटन<br>विद्यार्थ्यांचा उत्साह |

वरील सोहळ्यास तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा,

२) आत्मकथन -

वृक्षाचे आत्मकथन

३) वैचारिक -

मोबाईल शाप की वरदान

❖❖❖